आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२५ फेब्रुवारी २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसाच्या इस्रायल दौऱ्यासाठी रवाना

- जागतिक स्तरावर समान आण्विक नि:शस्त्रीकरण धोरणाची आवश्यकता असल्याचं परराष्ट्र व्यवहार सचिवांचं प्रतिपादन

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते महाराष्ट्राच्या बुलडाणा जिल्ह्यात शेगाव इथं आरोग्य मेळ्याचं उद्घाटन

- पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या मूळ आरेखनात जायंट मीटरवेव्ह रेडिओ दुर्बिणीच्या अँटेनाला व्यत्यय येत असल्यामुळे केंद्र सरकारचा आक्षेप

**आणि**

- टी-ट्वेन्टी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या सुपर एट फेरीत आज श्रीलंका आणि न्यूझीलंड यांचा सामना रंगणार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसाच्या इस्रायल दौऱ्यासाठी आज रवाना झाले. या भेटीमुळे दोन्ही देशांतील दीर्घकालीन मैत्रीचे संबंध अधिक दृढ होतील, असं प्रधानमंत्र्यांनी दौरा सुरु करण्यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. या दौऱ्यातून सामरिक भागीदारी आणि समृद्ध भविष्यासाठी दोन्ही देशांचा समान दृष्टीकोन अधिक बळकट होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे. या भेटीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी इस्रायलचे प्रधानमंत्री बिन्यामिन नेतान्याहू यांच्या बरोबर उभय राष्ट्रांदरम्यानच्या धोरणात्मक भागीदारीच्या प्रगतीचा आढावा घेतील. सहकार, कृषी, संरक्षण, जलव्यवस्थापन, व्यापार, नवोन्मेष, तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रातल्या भागीदारीविषयी दोघांमधे चर्चा होईल.

इस्त्राएलचे राष्ट्रपती आयझॅक हर्झोग यांची भेट प्रधानमंत्री घेणार असून इस्रायलमधील भारतीय नागरिकांशीही संवाद साधणार आहेत. इस्रायलच्या संसदेत प्रधानमंत्री मोदी यांचं भाषण होणार आहे.

**<><><><><>**

जागतिक स्तरावर सर्व देशांसाठी समान आण्विक नि:शस्त्रीकरण धोरण असण्याची तसेच शस्त्रास्त्रांसाठीची चढाओढ थांबवून शांतता आणि स्थैर्य राखण्याची आवश्यकता असल्याचं परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी म्हटलं आहे. जागतिक नि:शस्त्रीकरणासाठी जिनिव्हा इथे सुरु असलेल्या उच्चस्तरीय परिषदेत ते आज दूरस्थ पद्धतीने भाषण करत होते. भारत अतिशय जबाबदारीच्या भावनेतून केवळ स्वसंरक्षणापुरता अण्वस्त्रांचा किमान साठा बाळगत असल्याचं त्यांनी सांगितलं. संरक्षण क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जबाबदारीच्या भावनेने करण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. ग्लोबल साऊथच्या विकास, समावेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या लोकशाहीकरणासाठी भारत प्रयत्नशील असून त्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून एआय इम्पॅक्ट शिखर परिषदेचं आयोजन भारतात करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज नवी दिल्ली इथं पुसा कृषी विज्ञान मेळाव्याचं उद्घाटन केलं. खतांची उपलब्धता, बनावट कीटकनाशकांच्या विक्रीला आळा घालणं अशा अनेक उपाययोजना सरकार शेतकऱ्यांसाठी राबवत असल्याचं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्री फसल बीमा योजने अंतर्गत आतापर्यंत सुमारे एक लाख ९२ हजार कोटी रुपयांचं वितरण शेतकऱ्यांना केलं आहे असं ते म्हणाले.

**- - - होल्ड बाईट- शिवराज सिंग चौहान - -**

दोन दिवसीय कृषी मेळाव्याची संकल्पना 'विकसित कृषी, आत्मनिर्भर भारत' अशी आहे. चौहान यांनी गहू, मोहरी, कोबी, फळबागा तसंच विविध फूलपिकांच्या शेतांना भेट दिली, यावेळी त्यांनी शेतकरी आणि उत्पादकांशी संवाद साधला.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकांसाठी तैनात केल्या जाणाऱ्या केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या गाड्यांवर जीपीएस प्रणाली बसवण्याचा निर्णय भारतीय निवडणूक आयोगाने घेतला आहे. निवडणूक आयोगाच्या केंद्रीय निरीक्षकांना या प्रणालीमुळे या गाड्यांच्या ठिकाणाबद्दल अद्ययावत माहिती मिळत राहील. पश्चिम बंगाल मध्ये येत्या १ तारखेला केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या पहिल्या २४० तुकड्या तैनात केल्या जाणार आहेत तर पुढच्या २४० तुकड्या १० मार्चपासून तैनात होतील असं आयोगाने म्हटलं आहे.

**<><><><><>**

अग्नीवीर आणि भारतीय लष्करातील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर भारतीय रेल्वे सेवेत सामावून घेण्याबाबतचा सामंजस्य करार केला जात आहे. भारतीय लष्कराच्या माहिती विभागाचे अतिरीक्त महासंचालकांनी समाज माध्यमावर या संदर्भात संदेश लिहून ही माहिती दिली. सेवानिवृत्त लष्करी कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांना सेवानिवृत्तीनंतर सन्मानानं आयुष्य जगता यावं, हा या मागचा उद्देश असल्याचं या संदेशात नमूद केलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या महाराष्ट्र दौऱ्याचा आज दुसरा दिवस असून बुलडाणा जिल्ह्यात शेगाव इथं आरोग्य मेळ्याचं उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं. या चार दिवस चालणाऱ्या या आरोग्य मेळ्यात आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी उपचार पद्धतीतला मोफत वैद्यकीय सल्ला, तपासण्या आणि औषधं उपलब्ध करून दिली जाणार आहेत. औषधी वनस्पतींची लागवड आणि कृषी वनीकरणाच्या माध्यमातून आयुष पद्धतींबाबत जनजागृती करणे, सर्वसमावेशक आरोग्यसेवा पुरवणे आणि शेतकऱ्यांसाठी नव्या रोजगाराच्या संधी निर्माण करणं हा या मेळ्याचा उद्देश आहे. मेळाव्यापूर्वी राष्ट्रपती मुर्मू यांनी शेगाव इथं संत श्री गजानन महाराज समाधीचं दर्शन घेतलं. संध्याकाळी राष्ट्रपती नागपूर इथं ब्रह्मकुमारी संस्थेच्या कार्यक्रमाला उपस्थित राहतील.

**<><><><><>**

पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या मूळ आरेखनामधे जायंट मीटरवेव्ह रेडिओ दुर्बिणी ऑब्जर्व्हेटरीच्या अँटेनाला व्यत्यय येत असल्यामुळे केंद्र सरकारनं या मूळ मार्गाला आक्षेप घेतला असून सध्या हा विषय तिथेच थांबला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज महाराष्ट्र विधान परिषदेत दिली. या प्रकल्पाचा मूळ मार्ग बदलून तो शिर्डीमार्गे नेण्यासंदर्भात आमदार सत्यजित तांबे यांनी प्रश्न उपस्थित केला. सरकारची भूमिकाही आधीच्या मार्गाला अनुकूल असून यातून मार्ग काढण्यासाठी हा मार्ग कमीत कमी बदलावा लागेल या दृष्टीने तज्ज्ञांची नियुक्ती करून त्यांच्याकडून पर्यायी आखणी करून घेऊ आणि त्यानुसार काम करू, जेणेकरून या मार्गातून सुटलेला भाग आणि गावंही याच्याशी जोडली जाऊ शकतील, असं आश्वासन त्यांनी दिलं.

मुंबईत सुरू असलेल्या सर्व बांधकामांवर देखरेख ठेवण्यासाठी इंटरनेट ऑफ थिंग्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने एक व्यवस्था तयार करण्याचे आदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिले आहेत आणि ते लवकरच पूर्ण करू, असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. मुंबईत हवेची गुणवत्ता खालावल्याचा मुद्दा परब यांनी उपस्थित केला. त्यावर, मुंबईत बांधकामाच्या नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करू, असं पंकजा मुंडे यांनी सांगितलं.

मासिक पाळीच्या काळात महिलांना रजा मिळण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार एक समिती नेमण्यात येईल आणि त्यानुसार यासंदर्भात निर्णय घेतला जाईल असं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज महाराष्ट्र विधानसभेत सांगितलं. जितेंद्र आव्हाड यांनी याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती.

राज्यात धडक मोहीम राबवून स्त्री भ्रूणहत्येचे प्रकार जिथं घडत असतील त्यावर कठोर कारवाई केली जाईल असं आबिटकर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशात उभारल्या जात असलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचं मूल्यमापनासाठी उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाच्या नेटवर्क प्लॅनिंग ग्रुपनं नवी दिल्लीत बैठक घेतली. प्रधानमंत्री गतीशक्ती राष्ट्रीय योजनेशी सुसंगत अशी बहुआयामी संपर्क व्यवस्था निर्माण करणं आणि मालवाहतूक क्षमता वाढवणं हा या बैठकीचा उद्देश होता. याबैठकीत रेल्वेच्या दोन, एक मेट्रो आणि विमानतळ प्रकल्पांचं मूल्यमापन करण्यात आलं.

**<><><><><>**

न्यायपालिकेत भ्रष्टाचार होत असल्याचा उल्लेख एनसीईआरटीच्या इयत्ता आठवीच्या पाठ्यपुस्तकात आल्याची दखल घेत सर्वोच्च न्यायालयानं ही बाब अतिशय गंभीर आणि संविधानाच्या मूलभूत संरचनेच्या विरोधात असल्याचं वक्तव्य केलं आहे. न्यायपालिकेतला भ्रष्टाचार, न्यायालयांमधल्या प्रलंबित खटल्यांचा मोठा कार्यभार आणि न्यायमूर्तींची कमतरता ही न्यायपालिकेसमोरची आव्हानं असल्याच या पाठ्यपुस्तकात म्हटलं आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत तसंच न्यायमूर्ती जोयमाल्या बागची आणि विपुल पांचोली यांच्या पिठासमोर वरिष्ठ वकील कपिल सिबल यांनी ही बाब निदर्शनाला आणून दिली.

**<><><><><>**

टी-ट्वेन्टी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या सुपर एट फेरीत आज श्रीलंका आणि न्यूझीलंड यांच्यादरम्यान सामना होणार आहे. कोलंबो इथल्या स्टेडीयमवर संध्याकाळी ७ वाजता सामन्याला सुरुवात होईल. काल झालेल्या सामन्यात इंग्लंडनं पाकिस्तान संघाचा पराभव करत उपांत्यफेरी गाठली. कर्णधार हॅरी ब्रुकच्या शतकी खेळीच्या जोरावर इंग्लंडनं १६४ धावांचं आव्हान शेवटच्या षटकात पूर्ण केलं.

**//<><><><><>//**